# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २८ ऑक्टोबर २०२२

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५२३/२०२२ भादंविसक ३०२,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २७/१०/२०२२ रोजी ०८.३० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरासमोर, बिसमिल्ला मस्जीद पाठीमागे, राहुल गांधी झोपडपट्टी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २८/१०/२०२२ रोजी ००.४५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुरेखा नितीन कट्टीमणी, वय- २५ वर्षे, रा. बिसमिल्ला मस्जीद पाठीमागे, राहुल गांधी झोपडपट्टी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मावस भाऊ चंद्रकांत ऊर्फ बबलु चिकाटे, २) मावशी नंदा चिकाटे, तसेच ३) मावस बहिण संतोषी ऊर्फ संतु चिकाटे |
| **मयताचे नाव** | : | अंबु विठ्ठल कट्टीमणी, वय- ६० वर्षे, रा. बिसमिल्ला मस्जीद पाठीमागे, राहुल गांधी झोपडपट्टी, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे राहते घरासमोर पती नितीन कट्टीमणी याचेशी उधारीचे पैसे देणे घेण्याच्या कारणावरुन दि. २०/१०/२०२२ रोजी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन वरील आरोपीतांनी मारहाण हाताने वा लाथाबुक्याने मारहाण करीत असताना, यातील फिर्यादीची सासु अंबु विठ्ठल कट्टीमणी ही भांडणे सोडविण्यास मध्ये गेली असता, फिर्यादीचे सासुस आरोपीत क्रं. १ याने हाताने व लाथाबुक्याने, तसेच आरोपीत क्रं. २ व ३ यांनी हाताने मारहाण करुन सासु अंबु विठ्ठल कट्टीमणी यांना जिवे ठार मारले आहे म्हणून. फिर्यादीची वरील आरोपीतांविरुध्द फिर्याद आहे म्हणून. तपास:- पोसई/ मोतेकर - ८२०८४२५५२१ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८२५/२०२२ भादंविसक ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २६/१०/२०२२ रोजी १७.३० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २८/१०/२०२२ रोजी १४.१४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | राधिका संतोष गुंगेवाले, वय- ३० वर्षे, रा. ५१,१४ नंबर शाळेजवळ, बेडरपुल, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) लक्ष्मी गुंगेवाले, २) अजय गुंगेवाले, ३) सुनिता फटफटवाले |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या घराजवळ उभ्या असताना फिर्यादीची मोठी मुलगी ही घरासमोर खेळत असताना शेजारी राहणारी आरोपीत क्रं. १ हिने फिर्यादीची मुलगी गायत्री हिस लहान मुलांमध्ये भांडण लावते असे म्हणून घाण घाण शिवीगाळ करत असताना, फिर्यादी या आरोपीतास जाब विचारण्यास गेली असता, वरील आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस मारहाण केली. तसेच आरोपीत क्रं. २ याने घराचे भिंतीवरील विट घेवुन डोक्यात मारुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- पोना/ १९६ माडे |